# शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद ठाणे

## नागरिकांची सनद

**महाराष्ट्र शासकिय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनिमयन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 कलम 8 मधील तरतूदीनुसार शिक्षण माध्यमिक विभाग जिल्हा परिषद ठाणे नागरिकांची सनद प्रसिध्द करीत आहे.**

प्रस्तावना

शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांचे मार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचे मुख्य उद्दिष्ट माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढविणे व ती टिकविणे हे असून योजनांचा फायदा प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत शैक्षणिक विकास साधण्याचा विभागाचा सदैव प्रयत्न असतो.

माध्यमिक शिक्षण विभागाकडे ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक शाळातील शिक्षकांच्या प्रशासनाची जबाबदारी असते.या विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता, सर्वांगीण विकासाकरिता विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, INSPIRED AWARD, मानव विकास योजना, इ. योजनांचा समावेशआहे.

महत्वाचे कार्य:

१. नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देणे.

२. विनाअनुदानित माध्यमिक शाळांचे मुल्यांकन करणे.

३. विनानुदानित तुकड्यांना अनुदानावर आणणे.

४. माध्यमिक शाळेतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता देणे.

५. शाळेची पट पडताळणी करणे.

६. वेतनेतर अनुदानाची तपासणी करणे.

७. इ. 10 वी व 12 वी च्या परीक्षेबाबत कामकाज.

८. माध्यमिक शाळांची तपसणी करणे.

९.खासगी शाळांची सेवा निवृत्तीची प्रकरणे

१०. माध्यमिक शाळांमध्ये मानव विकास योजना राबविणे .

(देविदास महाजन)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद ठाणे.

## परिशिष्ठ-१

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळांना परवानगी देणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासनाकडे सादर करणे. | शासन आदेशानुसार | संबंधित कर्म चारी व अधिकारी | १.विभागीय शिक्षण उपसंचालक<br>२.प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था-अध्यक्ष<br>३.शिक्षणाधिकारी (प्राथमिक)-सदस्य<br>४.दुय्यम सहाय्यक निबंधक<br>५.उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)- सदस्य सचिव |
| २ | विनाअनुदानित शाळा अनुदानावर आणणे. | शासन आदेशानुसार | संबंधित कर्मचारी व अधिकारी | १.अध्यक्ष जिल्हा मुल्यांकन समिती<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>२. जिल्हाधिकारी नामनिर्देशित प्रतिनिधी<br>४.गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भिवंडी<br>५.राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक<br>६.पालक शिक्षक संघाचे प्रतिनीधी-२ |
| ३ | शिक्षण विभाग माध्यमिक कडील जि.नि.वि.मं. कडील योजनांचे मासिक खर्च अहवाल व त्रैमासिक खर्च अहवाल संकलन करुन वरिष्ठ कार्यालयास पाठविणे. | एक महिना त्रैमासिक | संबंधित कार्यासन कर्मचारी | अधिक्षक (माध्यमिक)वर्ग-२, कक्ष अधिकारी, याबाबत पर्यवेक्षण करतात. |
| ४ | शासनस्तर व इतर विभाग व संचालनालयाकडून | -- | संबंधित कार्यासन कर्मचारी | उपशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी शिक्षण हे याबाबत पर्यवेक्षण करुन एखाद्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून आलेले अर्ज, प्रस्ताव इ. पत्रव्यवहार. | | | कामाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास चौकशी करण्यात येते. |
| ५ | संच मान्यता | ऑनलाईन | संबंधित कर्म चारी व अधिकारी | ऑनलाईन पध्दतीने दिल्या जातात. |
| ६ | वैयक्तिक मान्यता | प्रस्ताव प्राप्त नुसार | संबंधित कर्म चारी व अधिकारी | मा.शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प.ठाणे कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासननिर्णयानुसार निर्णय घेतला जातो. |
| ७ | राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना. | वेळोवेळी शासनाने दिलेल्यानिर्देशानुसार | संबंधित कर्म चारी व अधिकारी | |
| ८ | माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापन करणेसाठी आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून आर्थिक सहाय्य घेण्याबाबत. | वेळोवेळी शासनाने दिलेल्यानिर्देशानुसार. | संबंधित कर्म चारी व अधिकारी | सदरची योजना ही मा.खासदार व मा.आमदार यांच्या निधीतून राबविण्यात येते. |
| ९ | अनधिकृत माध्यमिक शाळा बंद करणेबाबत. | वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार. | संबंधित कर्म चारी व अधिकारी | |
| १० | मानव विकास योजना | वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार. | संबंधित कर्म चारी व अधिकारी | महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८, मंत्रालय, मुंबई ३२. दि.१९ जुलै २०११ नुसार मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविणे व मानव विकासावर आधारीत योजना राबविणे या योजनेंतर्गत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ठाणे जिल्हयातील एकूण अनुक्रमे, शहापूर व मुरबाड या तालुक्यांमध्ये सदरची योजना राबविण्यात येत आहे. |
| ११ | आय.सी.टी.योजना (फेज-१ व फेज-२, फेज-३) (Information & Communication Technology in Schools): - | वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार. | संबंधित कर्म चारी व अधिकारी | सदरची योजना ही केंद्र शासन व राज्य शासनाच्या धोरणानुसार या योजनेत संगणक प्रयोगशाळेसाठी २५० ते ३०० चौरस फूट एवढया आकाराची पक्क्या स्वरुपाची सुरक्षित खोली उपलब्ध करुन द्यावी तसेच इंटरनेट सेवेसाठी शाळेचा दुरध्वनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. |
| १२ | विदयार्थ्यांच्या नाव, जात दुरुस्ती करणे | वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार. | संबंधित कर्म चारी व अधिकारी | विदयार्थ्यांचे जन्म तारिख जन्म स्थळ/जात/नांव /आडनाव/वडीलांचे व आईचे नावात बदल/दुरुस्तीची नोंद करण्यात येते. |

(देविदास महाजन)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद ठाणे